# नियमित दिवाणी दावा क्र.३८८/२०१९ मधील नि.५ खालील आदेश

०१. वादीनी दाखल केलेला प्रस्तूतचा अर्ज, सोबतचे प्रतिज्ञापत्र, प्रतिवादीतर्फे दाखल केलेले म्हणणे वाचले. दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

०२. मौजे कोळकी, ता. फलटण, जि. सातारा येथील बिनशेती प्लॉट मिळकत भुमापन क्र. ११९/२क प्लॉट नं. ५३ क्षेत्र ३५७.६७.६० चौ.मी., भुमापन क्र. ११९/२क प्लॉट नं. ५४, क्षेत्र ३५७.६७.६० चौ. मी. व भुमापन क्र. ११९/२क प्लॉट नं. ५५ क्षेत्र ३५७.६७.६० तसेच, मौजे कोळकी येथे स.नं. ११९/२क प्लॉट नं. ५३ मधील मालोजीराजेनगर भागातील मालमत्ता क्र. १२४२ पुर्व–पश्चिम ३० X २६ आर सी सी दगडवीट बांधकामातील तीन खोल्या संडास बाथरुमसह ही घर मिळकत व नवी मुंबई, वाशी कोपरखैराने भागातील सेक्टर नं. ७ येथील गुरूदेव को–ऑप. हाऊसिंग सोसा. लिमीटेड मधील रूम नं. ११ही घर मिळकत येणप्रमाणे सदर मिळकती या दाव्याचा वाद विषय असून यापुढे त्यांना ''दावा मिळकत'' म्हणून संबोधले आहे.

०३. वादीने पुढे असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादींविरूध्द दि. २१/०९/२०१२ रोजी केलेले मृत्यूपत्र बेकायदेशीर असल्याने ते रद्द होवून मिळावे याकरिता, तसेच सदर मिळकतीत वादीचा कायदेशीर हक्क आहे व सदर मृत्युपत्र हे वादीचे दावा मिळकतीमधील असणा–या कायदेशीर अविभक्त हिश्यावर बंधनकारक नाही असे जाहीर होवून मिळकण्यासाठी केला आहे. तसेच प्रतिवादी नं. २ यांनी प्रतिवादी नं.१ चे लाभात करून दिलेले दि.१८/०५/२०१८ रोजीचे बक्षीसपत्र हे वादी यांचे दावा मिळकतीतील कायदेशीर हिश्यावर बंधनकारक नाही असे जाहीर होवून मिळावे यासाठी दाखल केले आहे. तसेच प्रतिवादी नं. १ यांनी दावा मिळकतीचे अधिकार अभिलेखामध्ये दि.२१/०९/२०१२ रोजीचे मृत्यूपत्र व दि.१८/०५/२०१८ रोजीचे बक्षीसपत्राने मालक म्हणून असलेल्या

पोकळीस्त नोंदीच्या आधारे तथा गैरफायदा घेवून त्रयस्थ इसमाच्या लाभात कोणत्याही प्रकारे दाव्याचा निर्णय होईपर्यंत हस्तांतरण करू नये अशी प्रतिवादी नं. १ यांना तुर्तातुर्त ताकीद देण्याकरिता वादी यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

०४. वादीने पुढे असे कथन केले आहे की, सदर दाव्यातील वादी व प्रतिवादी क्र. १ हे सख्खे भाऊ आहेत व प्रतिवादी क्र. २ या वादी व प्रतिवादी क्र. १ ची आई आहे. वादी व प्रतिवादी क्र. १ चे वडील मारूती सोनवणे हे दि.३/०९/२०१५ रोजी मयत झालेले आहेत. दावा कलम १ मध्ये वर्णन केलेल्या बिनशेती प्लॉट मिळकती व बांधकाम केलेली घर मिळकत व मुंबई येथील मिळकत या सर्व मिळकती वादी व प्रतिवादी क्र. १ चे वडील मारूती सोनवणे व वादी या दोघांनी त्यांचे पगाराचे उत्पन्नातुन व पैसे उसने घेवून संयुक्तीकरितत्या प्रतिवादी नं. २ यांचे नावे केलेल्या होत्या. त्यामध्ये वादी व प्रतिवादी नं. १ व२ यांचे एकत्र कुटूंबात खरेदी केलेल्या मिळक्तीचे वाटप झालेले नाही. वादी व प्रतिवादी क्र. १ चे वडील मयत होण्यापुर्वी दि.२१/०९/२०१२ रोजी मृत्युपत्र केल्याचे कधीही बोलुन दाखविले नव्हते व तसा त्यांचा हेतु नव्हता. वादीचे वडील अलमायझर व डायबेटीक या आजाराचे पेशंट होते व ते दारूच्या आहारी गेलेले होते. प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांचे आजारपणाचा व व्यसनाधिनतेचा फायदा घेवून दारू पाजुन सदरचे मृत्यूपत्र करून लबाडीने मिळकती स्वतःचे नावे करून घेतल्या आहे. त्यामुळे वादीचे एकत्र कुटूंबातील दावा मिळकतीतील कायदेशीर प्राप्त व्यक्तीगत हिश्यावर कोणताही परीणाम होत नाही. वादीचे वडीलांचे मृत्यूपश्चात तब्बल दोन वर्षांनी दि.२६/११/२०१७ रोजी प्रतिवादी क्र. ३ ॲड. सर्जेराव महादेव भोसले यांनी वादी यांचे कब्जेवहिवाटीस असलेल्या रुम नं.११ या इमारतीचे सेक्रेटरी/सचिव, गुरूदेव हाऊसिंग को–ऑप. सोसायटी, वाशी, कोपरखैरणे, मुंबई यांना नोटीस देवून सदर रुमवर प्रतिवादी क्र. १ यांची मृत्युपत्राने मालक म्हणुन नाव दाखल करणेबाबत कळविले. त्यासोबत त्यांनी सदर मृत्यूपत्र पाठविलेले होते. सदर मिळकत ही वादी व त्यांचे वडील यांनी कर्ज प्रकरण करून खरेदी केलेली आहे. त्याचे संपुर्ण हप्ते

वादी यांनी त्यांचे पगारातुन भरलेले आहेत.

०५. वादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, मौजे कोळकी येथील स.नं. ११९/२क पैकी प्लॉट नं. ५३ व ५५ हे वादी व प्रतिवादी क्र. १ यांचे वडील मारूती सोनवणे व प्लॉट नं. ५४ हे प्रतिवादी क्र. २ शांता सोनवणे यांचे नावे केवळ कुटूंबातील कुटूंब प्रमुख म्हणून व कौटूंबिक व्यवस्था म्हणुन खरेदी घेतलेले होते. सदर मिळकती वादीचे आर्थिक योगदानाशिवाय खरेदी करण्याची ऐपत त्यांची नव्हती. तसेच सिटी सर्वे नं. ११९/२क पैकी प्लॉट नं. ५३ या मिळकतीवर बांधकाम केलेली मालमत्ता क्र.१२४२ या इमारतीचे बांधकाम हे वादीने त्याच्या पगारातुन बचत केलेली रक्कम व उसने घेवून केलेली आहे. त्यामुळे सदर दावा मिळकतीमधील कायदेशीर हक्क डावलुन तथाकथित मृत्यूपत्राच्या आधारे विल्हवाट लावायचा कोणताही अधिकार वादीचे वडीलांना नव्हता. सदर मृत्यूपत्रातील साक्षीदार मोहन देवकर व किशोर मोहिते यांचा वादीचे कुटूंबाचा दुरान्वये संबंध नाही. तसेच त्यास प्रतिवादी क्र.३ यांनी स्वतः ओळख घातली आहे. प्रतिवादी क्र.३ यांनी दिलेली नोटीस पाहता त्यांना मृत्युपत्राने एक्सीक्युटर म्हणून नेमणुक केली नसताना देखील सदर नोटीस देवून प्रतिवादी क्र. १ ची नोंद सदर मिळकतीस करण्याचे कळविले आहे. मृत्यूपत्रातील वादीचे वडील मारूती सोनवणे यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र पाहता ते दि.१२/०९/२०१२ रोजीचे असून, मृत्यूपत्र हे दि.२१/०९/२०१२ रोजीचे आहे. त्यामुळे सदर दिवशी वादीचे वडील यांची शारीरीक व मानसिक स्थिती कशी होती याबाबतची वस्तुस्थिती समोर येत नाही. तसेच मृत्यूपत्रातील पान क्र. ४ मधील मजकुरामध्ये खाडाखोड वेगवेगळया शाईमध्ये केली आहे. खाडाखोड केलेला मजकुर हा वादी व त्यांच्या मुलाविषयी होता, तो नष्ट केलेला आहे. त्यामुळे सदर मजकुराचे सत्यतेविषयी प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे सदर बनावट मृत्युपत्राने प्रतिवादी क्र. १ यास कोणताही अधिकार व मालकी प्राप्त होत नाही.

०६. वादीचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ याने त्याचे नाव मौजे कोळकी येथील बिनशेती प्लॉट मिळकतीस स्वतःच्या नावाची नोंद सदर मृत्युपत्राने करून घेतली असल्याचे वादी यांच्या निदर्शनास आले. तसेच प्रतिवादी क्र. २ हिने प्रतिवादी क्र. १ चे लाभात दि.१८/०५/२०१६ रोजी स.नं. ११९/२क पैकी प्लॉट नं. ५४ चे बक्षीसपत्र केल्याचे निदर्शनास आले. सदरचे सर्व दस्त हे प्रतिवादी यांनी वादी हे मुंबई येथे नोकरीत असल्याचा गैरफायदा घेवून लबाडीने करून घेतले आहे. सदरची मिळकत ही वादी यांनी स्वतःच्या पगाराच्या उत्पन्नातुन व वडीलांच्या उत्पन्नातुन खरेदी केलेल्या आहेत. सदर मिळकत ही कौटूंबिक व्यवस्था म्हणून प्रतिवादी क्र. २ च्या नावे केलेली होती. त्यामुळे प्रतिवादी क्र. २ यांना वादीचे संमतीशिवाय सदर मिळकत हस्तांतरण करण्याचा अधिकार नव्हता.

०७. वादीचे पुढे असे कथन की, प्रतिवादी क्र. १ ने संपुर्ण दावा मिळकत गिळंकृत करण्याच्या वाईट हेतुने बेकायदेशीर बक्षीसपत्र अस्तीत्वात आले आहे. दाव्यातील मिळकत या एकत्र कुटूंबाच्या मिळकती आहेत. वादी व प्रतिवादी यांच्यात लेखी अथवा तोंडी वाटप झालेले नाही. त्यामुळे वादी व प्रतिवादी क्र. १ चे वडील यांना मृत्युपत्र करून ठेवण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नव्हता. वादीने समक्ष प्रतिवादी क्र. १ यास भेटून केलेल्या मृत्युपत्राबाबत विचारणा केली असता, त्यांनी सदर मिळकत ही त्यांनी सास-याच्या मदतीने मृत्युपत्र करून दारू पाजुन करून घेतल्याचे व वादीचा मिळकतीमध्ये हिस्सा येत नाही असे सांगितले. असे म्हणुन त्यांनी वादीचा हक्क नाकारला आहे. त्यामुळे प्रस्तुतचे मृत्युपत्र व बक्षीसपत्र रद्द करून मिळण्याकरिता व दावा मिळकतीच्या संदर्भाने कोणत्याही प्रकारे त्रयस्थ इसमाच्या लाभात हस्तांतरण करू नये व दावा मिळकतीमध्ये वादीचा कायदेशीर एक त्रीतांश हिस्सा हक्क व अधिकार आहे असा जाहिर ठराव करून मिळण्यासाठी सदरचा दावा केलेला आहे. सदर दाव्याचा अंतीम निर्णय होण्यास बराच कालावधी जाणार आहे. प्रतिवादी क्र. १ यांनी सातबारास असलेल्या नोंदीच्या आधारे दावा मिळकतीचे हस्तांतरण केल्यास वादी यांचे कधीही पैशात

भरुन न येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे दाव्याचा अंतीम न्यायनिर्णय होईपर्यंत दावा मिळकतीच्या संदर्भाने फेरबदल, विक्री अथवा हस्तांतरण करू नये अशी प्रतिवादी क्र.१ ला तुर्तातुर्त ताकीद देण्यात यांवी ही विनंती.

०८. प्रतिवादी क्र.३ यांनी नि.१८ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन वादीचे अर्जातील कथने नाकारलेली आहे. प्रतिवादी क्र. ३ चे असे म्हणणे आहे की, दावा कलम १ अ, ब, क मध्ये केलेल्या मिळकतीचे वर्णन चुकीचे आहे. वादी प्रतिवादी क्र. १ चे वडील कधी वारले ते या प्रतिवादीला माहित नाही. दावा कलम ३ मधील लिहिलेला मजकुर चुकीचा आहे. कारण सदर मिळकती वादी व त्यांच्या वडीलांनी एकत्र उत्पन्नातुन विकत घेतल्या हे खोटे आहे. तसेच ते दारूच्या आहारी होते हे ही खोटे आहे. प्रतिवादी क्र. ३ हे सन १९६९ ते २००७ पर्यंत फलटण नगर पालीका फलटण शाळेमध्ये प्राथमिक शिक्षक म्हणून काम करीत होते व ते सध्या वकीली व्यवसाय करत आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ सोबत सदर प्रतिवादीची वकील व पक्षकार म्हणून ओळख झाली. प्रतिवादी क्र. १ च्या सांगण्याप्रमाणे दि.२६/११/२०१७ मध्ये प्रतिवादी क्र. ३ ने सदर गुरूदेव हाऊसिंग सोसायटी कोपरखैरणे मुंबई यांना प्रतिवादी क्र. १ ची नोंद मृत्युपत्राने करण्याबाबत कळविले. यामध्ये प्रतिवादी क्र. ३ चा कोणताही वाईट हेतु नव्हता. केवळ प्रतिवादी क्र. १ चे वकील म्हणुन त्यांनी सदरचे पत्र पाठविले होते. त्यामुळे दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. ३ चा कोणताही हक्क नाही व तसचे कोणताही सबंध नाही. सदरच्या मिळकती वादीने स्वतःच्या उत्पन्नातुन घेतल्या याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

०९. प्रतिवादी क्र. ३ चे पुढे असे कथन आहे की, दावा कलम ६ मधील संपुर्ण मजकुर खोटा आहे. प्रतिवादी क्र. ३ हे वकील असल्याने मारूती सोनवणे यांनी स्वतःचे मृत्युपत्र दि.२१/०९/२०१२ रोजी प्रतिवादी क्र. ३ कडे काही कायदेशीर त्रुटी आहेत का हे पाहाण्यासाठी दाखवले. तसेच सदरचे मृत्युपत्र नोंदणीकृत करून देणेसाठी विनंती केली. मारूती

सोनवणे यांच्या तोंडी विनंतीवरून प्रतिवादी क्र. ३ ने केवळ त्यांना ओळखतो म्हणून दुय्यम निबंधक, फलटण यांच्यासमोर ओळख घातली आहे. त्यामध्ये प्रतिवादी क्र. ३ चा कोणताही वाईट हेतु नव्हता. परंतु प्रतिवादी क्र. ३ ची बदनामी करणेसाठी व मानसिक त्रास देणेसाठी त्यांना सदर दाव्यात विनाकारण प्रतिवादी केलेले आहे. सदर दाव्यात प्रतिवादी क्र. ३ विरूध्द कोणतीही मागणी केलेली नाही. त्यामुळे सदर दाव्यास सी पी सी ऑर्डर १ रुल ९ चुकीचा पक्षकार केलेची बाधा येत आहे. त्यामुळे सदरचा दावा रद्द करणेत यावा. वादीचा सदरचा दावा प्रतिवादी क्र. ३ च्या विरूध्द खोटा व बनावट आहे. सबब, वादीने प्रतिवादी क्र. ३ यास नुकसान भरपाई म्हणून सी. पी. सी. कलम ३५ अ प्रमाणे र.रु. १०,०००/– देण्याचा हुकूम व्हावा ही विनंती.

१०. प्रतिवादी क्र. १ व २ ने वादीचे अर्जावर नि.३७ वर म्हणणे दाखल करून, अर्जातील मजकुर नाकारला आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांचे असे म्हणणे आहे की, वादीने दावा कलम १ मध्ये शेवटचे परिच्छेदामध्ये प्रतिवादीचा मालकीहक्क मान्य केला आहे. दावा मिळकत या मारूती सोनवणे यांचे स्वकष्टार्जीत उत्पन्नातील खरेदीच्या मिळकती आहेत. त्यांना त्यांचे वडीलांकडून शिक्षणाखेरीज काहीही स्थावर व जंगम मिळकत मिळालेली नाही. वादी हा नोकरीस असल्याने त्यास दरमहा ५० ते ६० हजार पगार मिळत असल्याचे, तसेच त्याचे नावे वाशी येथे स्वतःचे मालकीचे घर असल्याने मारूती सोनवणे यांनी त्यांचे हयातीत त्यांचे स्वतःचे दावा मिळकतीचे दि.२१/०९/२०१२ रोजी नोंदणीकृत मृत्युपत्र साक्षीदारासमक्ष प्रतिवादी क्र. १ त्यांचा धाकटा मुलगा याला त्यास कायमस्वरूपी नोकरी नसल्याने मिळणारा पगार तुटपुंजा असल्याने त्यास आर्थिक मदतीची आश्यकता होती म्हणून करून दिले. सदरचे मृत्युपत्र कायद्याने नोंदणीकृत आहे. दावा मिळकत ही एकत्र कुटूंबाची नसल्याने ती दावा मिळकतीचा भाग होवू शकत नाही. वादीचा दावा मिळकतीमध्ये कसलाही हक्क अगर हिस्सा कायदयाने येत नाही. वादी राहत असलेली खोली मारूती सोनवणे यांनी घेवून दिली आहे. वादीस नोकरी

असूनही त्याने कधी आई वडीलांना घरखर्चासाठी पैसे दिले नाहीत. वादी हा प्रतिवादी क्र. २ ला सांभाळत नाही. बक्षीसपत्रानंतर वादीने प्रतिवादी क्र. २ यांना मारहाण केली. प्रतिवादी क्र. १ हा प्रतिवादी क्र. २ ला सांभाळत आहे. बक्षीसपत्र हे नोंदणीकृत व साक्षीदारासमक्ष नोंदणी अधिकारी यांचेपुढे नोंदलेले असल्याने कायदेशीर आहे.

११. प्रतिवादी क्र. १ व २ चे पुढे असे कथन आहे की, दावा मिळकतीमधील मिळकती घेण्यामध्ये वादीने त्यांचे पगारातुन, बचतीतुन मारूती सोनवणे यांना मदत केलेचा मजकुर खोटा आहे. मुळातच दावा मिळकती या एकत्र कुटूंबाचे खरेदीचे मिळकती नाहीत. त्यामुळे वाटपाचा प्रश्नच कधही आलेला नाही. वादीचे वडीलांना कसलेही व्यसन नव्हते. त्यांनी पोलीस खात्यामध्ये पुर्ण नोकरी केली होती. ते कधीही दारूचे आहारी गेलेले नाहीत. त्यांना वादीने कथन केल्याप्रमाणे अलमायझर अथवा डायबेटीकचा आजार नव्हता. दावा कलम १क मधील फ्लॅट मिळकत ही वादीने व मारूती सोनवणे यांना खरेदी केल्याचे खोटे आहे. तसेच प्लॉट नं. ५३, ५५ या दाव्यातील मिळकती या मुळच्या प्रतिवादी क्र. १ यांचे वडील मारूती सोनवणे व प्लॉट नं. ५४ त्यांची पत्नी प्रतिवादी नं.२ यांचे स्वकष्टार्जीत उत्पन्नाचे खरेदीचे मिळकती आहेत. दाव्यातील सर्व मिळकती या मारुती सोनवणे व प्रतिवादी क्र. २ यांचे पुर्णपणे खरेदीमालकीचे होत्या. त्यामुळे मिळकतीचा उपभोग घेण्याचा तसेच त्यांची विल्हेवाट लावण्याचा पुर्ण अधिकार त्यांना होता. सदर मिळकती घेताना वादी यांनी कसलीही आर्थिक मदत वादीने केलेली नव्हती. तसेच वादीने तिन्ही बिनशेती प्लॉट खरेदीकरताना पगारातील रक्कम मारूती सोनवणे व त्यांची पत्नी प्रतिवादी क्र. २ यांना दिलेली नाही. त्यामुळे वादीचा दावा नामंजुर होण्यास पात्र आहे. सदर मिळकती या वादी व प्रतिवादी यांचे एकत्र कुटूंबाचे वडिलार्जीत कधीही नव्हत्या. सदर मिळकती प्रतिवादी क्र. १ यांना वादीचे वडीलांनी रजिस्टर मृत्युपत्राने दिलेल्या आहेत. त्यामुळे वादीचा दावा मिळकतीमध्ये कसलाही हक्क नसल्याने वादीचे वडीलांना तो डावलण्याचा प्रश्नच उदभवत नव्हता.

१२. प्रतिवादी क्र. १ व २ चे पुढे म्हणणे आहे की, कायद्याने दस्ताची नोंदणी करताना दस्तावरील साक्षीदार हे कुटूंबातील असणे आवश्यक नाही. दस्तावर त्यांच्या सहया साक्षीदार म्हणुन असणे आवश्यक असते. प्रतिवादी क्र. ३ हे वकील असून, त्यांना कायदेशीर गोष्टीची जान ठेवून ते कै. मारूती सोनवणे यांना ओळखत असल्याने त्यांनी दस्तास ओळख घातली आहे. त्यामुळे त्यांचा वादीचे कुटूंबाशी नातेसंबंध असायला हवा असे कोठेही कायदयात नाही. कोणताही फेरफार मंजुर होताना त्याबाबत नोटीस काढूनच म्हणणे देण्याची संधी देवूनच मगच फेरफार मंजुर होत असतो. वादीचा दावा मिळकतीशी कसलाही हक्क हितसंबंध नसल्याने त्याबाबत वादीस प्रतिवादी क्र. १ ने माहिती देण्याची आवश्यकता नाही. वादीने वैदयकीय प्रमाणपत्रावरची तारीख व मृत्युपत्र केल्याचे तारखेबाबत घेतलेला आक्षेप हा चुकीचा आहे. वादीचे वडीलांची मानसीक व शारिरीक स्थिती दि.२१/०९/२०१२ रोजी चांगली होती. त्यांना कसलाही आजार नव्हता. त्यामुळे दि.२१/०९/२०१२ रोजी केलेले मृत्युपत्र हे कायदेशीर होते. प्रतिवादीने सातारा येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात दि.२१/०९/२०१२ रोजी प्रोबेट अर्ज क्र. २/२०१८ दाखल केला होता. सदरचा प्रोबेट अर्ज हा दि.१२/०७/२०१९ रोजी मंजुर केला आहे. त्यामुळे सदर मृत्युपत्राने दाव्यातील मिळकतीचा मालकी हक्क हा प्रतिवादी यांना आला आहे.

१३. प्रतिवादी क्र. १ व २ यांचे पुढे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र. ३ ने दाव्यातील नमुद मृत्युपत्र हे खरे कायदेशीर असल्याने त्यांना दिलेल्या माहितीवरून त्यांनी गुरूदेव हाऊसिंग सोसायटी यांना प्रतिवादी क्र. १ चे नावाची नोंद लावणेबाबत नोटीस दिली होती. दावा कलम ७ मध्ये नमुद केलेले बक्षीसपत्राचा दस्त हा कायदेशीर होता व त्यानंतर झालेला फेरफार नं. ११८४३ हा संबंधितांना नोटीस काढून म्हणणे मांडण्याची संधी देवूनच मंजुर झालेला आहे. बक्षीसपत्रातील मिळकत या प्रतिवादी क्र. २ यांची स्वकष्टार्जीत

खरेदीमालकीची कब्जेवहिवाटीची होती. सदर फेरफाराविरुध्द वादीने कोठेही आजतागायत तक्रार केली नाही. वाद मिळकत गट नं. १९२/२क प्लॉट नं. ५४ ही प्रतिवादी क्र. २ ची स्वकमाईतील मिळकत असल्याने त्या मिळकतीची विल्हेवाट लावण्याचा अधिकार हा प्रतिवादी क्र. २ हीस होता. वादीचा त्यामध्ये हक्कच येत नसल्याने संगनमताने तो डावलण्याची कधी प्रश्नच निर्माण झाला नाही. सदरचे बक्षीसपत्र हे नोंदणीकृत असून ते दुय्यमनिबंधक अधिकारी फलटण यांचेसमोर साक्षीदारासमक्ष नोंदलेले आहे. त्यामुळे वादीस दाव्याचे कामी कोणतीही प्रथमदर्शनी केस नाही. तसचे दावा मिळकतीची विक्री करणेबाबत कोणतीही तुर्तातुर्त ताकीद सदर प्रतिवादी क्र. १ व २ विरूध्द वादीस दाव्याचे अंतिम निकालापर्यंत कायद्याने मागता येणार नाही. सबब, वादीचा सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा ही विनंती.

१४. माझे विचारार्थ निघालेले मुद्दे अणि त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे –

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीला प्रथमदर्शनी केस आहे काय ? | नाही. |
| २. | न्यायाचा तराजू, वादीच्या बाजुने आहे काय ? | नाही. |
| ३. | वादीचे पैशाने भरून न येणारे नुकसान होईल काय ? | नाही. |
| ४. | आदेश काय ? | अर्ज नामंजुर करणेत येत आहे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ३ बाबत**

१५. मुद्दा क्र.१ ते ३ हे एकमेकांशी सलग्न असल्याने कथनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्रीत विचारात घेण्यात आले आहेत. वादीनी त्यांचे कथनांचे पुष्ठयर्थ मौजे

कोळकी येथील गट नं. ११९/क प्लॉट नं. ५४ च्या ७/१२ उतारा नि.७ वर, मौजे कोळकी येथील गट नं. ११९/क प्लॉट नं. ५३ चा ७/१२ उतारा नि.८ वर, मौजे कोळकी येथील गट नं.११९/क प्लॉट नं. ५५ चा ७/१२ उतारा नि. ३/१ वर, मृत्युपत्राची साक्षांकीत प्रत नि.३/२ वर, बक्षिसपत्राची साक्षींकीत प्रत नि.३/३ वर व प्रतिवादी क्र. ३ यांनी दिलेल्या नोटीसची झेरॉक्स प्रत नि.३/४ वर दाखल केले आहेत.

१६. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी त्यांचे कथनाच्या पुष्ठयर्थ प्रतिवादी क्र. १ व २ ने करून दिलेला कुल मुखत्यार पत्राची मुळ प्रत नि.२४ सोबत दाखल केली आहे. तसेच प्रतिवादी यांनी मौजे कोळकी येथील फेरफार क्र. ११८४२ चा उतारा व मौजे कोळकी येथील फेरफार नं. ११८४३ चा उतारा हे नि.४२ सोबत दाखल केले आहेत.

१७. वादीचे विधीज्ञ यांनी त्यांचे युक्तीवादाचे पुष्ठयर्थ मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील बाळासाहेब दत्तोबा पवार वि. लालासाहेब दत्तोबा पवार [2022(3) All MR 189] या न्यायानिर्णयाचा आधार घेतला आहे. सदर न्यायनिर्णयामध्ये असे सांगितले आहे की, "The law has kept "the remedy of getting an adjudication from the Court as to ownership of properties bequeathed by the testator" open. That is to say whether testator is exclusive owner or joint owner. A person having claim in the ownership of the property or person challenging the bequest can certainly approach the Civil Court for such proceedings." सदर न्यायनिर्णतील गृहितके व सदर दाव्यातील परिस्थिती भिन्न असल्यामुळे सदर गृहितके या ठिकाणी लागू होणार नाहीत.

१८. वादी व प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी यांचे विद्वान विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादींच्या विधिज्ञानी दिलेल्या लेखी युक्तीवादाचे

अवलोकन केले. वादीतर्फे विद्वान विधीज्ञ यांनी त्यांच्या युक्तीवादात प्रस्तूत अर्जातील कथनांचा पुर्नउच्चार करुन वादीचा अर्ज मंजूर करणेबाबत विनंती केली आहे. तसेच प्रतिवादी यांचे विद्वान विधीज्ञ यांनी त्यांचे म्हणणेमधील कथनांचा लेखीयुक्तीवादामध्ये पुर्नउच्चार करुन वादीचा अर्ज फेटाळणेत यावा अशी विनंती केली.

१९. सदर युक्तीवादाचे अनुषंगाने वादी व प्रतिवादीनी दाखल केलेले कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादीचे लाभात अंतरिम आदेश देण्यापुर्वी वादीने प्रथमदर्शनी वादातील मृत्युपत्र हे संशयास्पद आहे हे शाबीत केले पाहिजे. तसेच नमुद मिळकतीबाबत सदर मृत्यपत्र तयार करण्यास वादीचे मयत वडील सक्षम नव्हते हे शाबीत करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र. १ यांनी मयत मारूती यांचेकडून सदर मृत्युपत्र कायदेशीर व्यवस्था म्हणुन फसवून तयार करून घेतले हे प्रथमदर्शनी शाबीत करणे आवश्यक आहे. वादीचे असे म्हणणे आहे की, दावा मिळकती त्यांनी व मयत मारूती सदाशिव सोनवणे यांनी पगारातुन बचत करून घेतल्या आहेत, त्यामुळे सदर दावा मिळकत या एकत्र कुटूंबाच्या मिळकती आहेत व त्यामुळे तथाकथीत मृत्युपत्राचा वादीचे दावा मिळकतीतील कायदेशीर हक्कावर काहीही फरक पडत नाही हे कथन देखील प्राथमिक दृष्टया शाबीत करावे लागेल. दावा मिळकतीमध्ये वादीचा १/३ वडीलोपार्जीत हिस्सा आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी कथन केले आहे की, दावा मिळकत मयत मारूती सदाशिव सोनवणे यांनी स्वकष्टाने संपादीत केल्या होत्या व त्यांचे हयातीत दोन साक्षीदारासमक्ष रजिष्टर मृत्युपत्राने प्रतिवादी क्र. १ चे नावे केले होत्या. प्रतिवादी क्र. २ ने रजिष्टर बक्षीसपत्राने वादीचे मयत वडील व आई वादीकडे राहत असल्याचे वादीचे म्हणणे नाही व सध्या प्रतिवादी क्र. २ या प्रतिवादी क्र.१ कडे राहण्यास आहे. निर्विवादरित्या मयत मारूती सोनवणे यांचे मृत्युपत्र प्रतिवादी क्र. १ चे लाभात आहे व सदर मृत्यूपत्राचे संदर्भात प्रोबेट देखील प्रतिवादी क्र. १ यांनी या दाव्यात दाखल केले आहे. वादीने या ठिकाणी दावा मिळकत त्यांनी व मयत मारूती सोनवणे यांनी एकत्रात खेरेदी केल्या होत्या हे दाखविण्यासाठी प्रथम दर्शनी कोणताही पुरावा

दिला नाही. वादीचे असे देखील म्हणणे आहे की, संबंधीत मृत्यूपत्रामध्ये वादीचे सदर मृत्युपत्रात त्याचे मुलांचे नावे असलेला मजकुर खोडण्यात आलेला आहे. परंतु सदर बाब आत्ता याठिकाणी प्राथमिकदृष्टया लक्षात घेता येणार नाही. कारण सदर बाब शाबीत करण्यासाठी वादीने आवश्यक तो पुरावा येथे आवश्यक आहे. वर नमुद कारणामुळे वादी प्रथमदर्शनी केस शाबीत करू शकला नाही. उपलब्ध पुरावा, वादी व प्रतिवादी यांची कथने पाहता वादीची तुर्तातुर्त मनाईची मागणी मान्य होणेस पात्र नाही. वादींनी त्यांना सकृतदर्शनी केस असल्याचे व न्यायाचा तराजू त्यांचे बाजूने असल्याचे निदर्शनास आणले नाही सबब या बाबी विचारात घेता, मद्दे क्र.१ ते ३ चे उत्तर 'नकारार्थी' देत आहे.

**मुद्दा क्र.४ बाबत.**

२०. वर चर्चिले मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्षाचे अनुषंगाने या अर्जाचे खर्चाची बाब अंतिम निर्णयाचेवेळी विचारात घेतली जाईल. सबब मुद्दा क्र.४ चे अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज नि.५ नामंजूर करणेत येत आहे.

२. खर्चाची बाब अंतिम निणर्याचे वेळी निर्णीत केली जाईल.

( आदेश खुल्या न्यायालयात घोषीत केला. )

फलटण
दिनांक : १६/०७/२०२२

**( सौ. उज्वला मि. वैद्य )**
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, फलटण

---